चेचक

मनोरमध्ये शनिवारी 'महा राजस्व समाधान शिबीर'

मनोर (प्रतिनिधी) : नागरिकांची महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित कामे जलदगतीने निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत १४ मार्च रोजी आंबेडकर नगर, वेळगाव रोड, गाव मनोर येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर लाल बहादूर शास्त्री विद्यालय मनोर येथे पार पडणार असल्याची माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली आहे. या विशेष शिबिरामध्ये विविध दाखले वाटप, सात बारा उतारा अद्ययावत करणे, सर्वांसाठी घरे या योजनेअंतर्गत पडताळणी व लाभ वाटप, ई मोजणी, पाणंद रस्त्यांबाबत कार्यवाही, तसेच अभिलेख दुरुस्ती संदर्भातील मदत कक्ष उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर पुरवठा विभागाशी संबंधित विषयांवर कार्यवाही, कृषी माहिती प्रणाली, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे आदी सेवा देखील नागरिकांना दिल्या जाणार आहेत.

दिव्यांगांसाठी 'एनएमबीटी'चा पुढाकार

मोखाडा (वार्ताहर) : पालघर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना सन्मानाचे आयुष्य मिळावे आणि त्यांना सर्व शासकीय योजनांचा लाभ वेळेवर मिळावा, या उद्देशाने मोखाडा पंचायत समितीत विशेष मार्गदर्शन व समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नारायणदास मोरबाई बुधराणी ट्रस्ट (एनएमबीटी) आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा 'दिव्यांग सर्वेक्षण प्रकल्प' राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत मोखाडा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये व्यापक सर्वेक्षण केले जाणार आहे. शासनाने मान्य केलेल्या २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाचा शोध घेऊन त्यांची अचूक नोंदणी केली जाईल. या नोंदणीमुळे दिव्यांगांना आवश्यक सेवा, सहायक साधने आणि पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध करून देणे सोपे होणार आहे. गट विकास अधिकारी अक्षय पागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीत विस्तार अधिकारी सुनील पाटील यांनी ग्रामसेवक आणि सरपंचांना मोलाचे मार्गदर्शन केले. "ग्रामपंचायत स्तरावर दिव्यांगांची अचूक ओळख पटवणे. प्रत्येक गावाने आपल्या विकास आराखड्यात दिव्यांग कल्याणासाठी विशेष तरतूद करावी," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नगरपरिषदेकडून 'अभय योजना' जाहीर

पालघर (वार्ताहर): पालघर शहरातील विकासात योगदान देणाऱ्या करदात्यांवरील दंडाचा बोजा कमी करण्यासाठी पालघर नगरपरिषदेने 'अभय योजना' लागू केली आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये (दंड) तब्बल ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. १९ मे २०२५ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता करावरील दंडामध्ये ५० टक्क्यांची भरघोस सूट मिळेल. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी मालमत्ता धारकांना मूळ थकीत कर आणि उर्वरित ५०% दंड एकाच वेळी (एकरकमी) भरणे अनिवार्य आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. नगराध्यक्ष उत्तम मोरेश्वर घरत, उपनगराध्यक्ष राजेंद्र पाटील आणि मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. "या योजनेमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून, जमा होणाऱ्या महसूल निधीतून शहरातील विकासकामांना अधिक गती दिली जाईल," असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

'सफाई मित्र' ॲपची शहरावर नजर

सार्वजनिक ठिकाणी कचरा केल्यास १ हजार रुपये दंड | तक्रार निवारणात दिरंगाई केल्यास कंत्राटदारालाही १० हजारांचा फटका

◆ विरार (प्रतिनिधी) :

वसई-विरार महापालिका क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिकांना आता १ हजार रुपये दंड आकारल्या जाणार आहे. त्याचप्रमाणे कचरा उचलण्याच्या तक्रारीबाबत कंत्राटदाराकडून दिरंगाई करण्यात आल्यास, कंत्राटदाराला प्रति दिवस दहा हजार रुपये प्रमाणे दंड आकारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

वसई-विरार शहर महापालिका क्षेत्रातील स्वच्छतेच्या तक्रारींचे तातडीने निवारण व्हावे यासाठी महापालिकेने तंत्रज्ञानाचा आधार घेतला आहे. महापालिका मुख्यालयात महापौर अजीव पाटील यांच्या हस्ते 'सफाई मित्र' या विशेष मोबाईल ॲपचे लोकार्पण करण्यात आले. या प्रणालीमुळे नागरिकांना रस्त्यावर पडलेल्या कचऱ्याचे फोटो थेट महापालिकेला पाठवता येणार असून त्यावर स्वच्छता विभागाकडून २४ तासांत कारवाई करणे बंधनकारक असणार आहे. कचरा उचलला न गेल्यास संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई देखील केली जाणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

वसई - विरार शहरात महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरातील दैनंदिन स्वच्छता केली जाते व जमा होणारा कचरा क्षेपणभूमीवर नेऊन टाकला जातो.

मात्र, शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे कचऱ्याचे प्रमाण अधिकच वाढू लागले आहे. बहुतेक जण कचरा कुंडीत न टाकता थेट रस्त्यावर टाकतात, काही ठिकाणी रस्त्याच्या कडेलाही कचऱ्याचे ढिगारे साचून राहतात. यामुळे आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता व दुर्गंधी निर्माण होते. याशिवाय आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागते. नागरिकांच्या अस्वच्छतेविषयक वाढत्या तक्रारी लक्षात घेता महापालिकेने आता 'सफाई मित्र ॲपच्या' मदतीने या समस्या सोडविण्याचा निर्णय घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेने सफाई मित्र ॲप सुरू आहे. नुकताच या ॲपचे लोकार्पण करण्यात आले आहे. यावेळी महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती प्रवीण शेट्टी, सभागृह नेते प्रफुल्ल साने, विरोधी पक्षनेते मनोज पाटील, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, दीपक सावंत यांच्यासह पालिकेचे वरिष्ठ अधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.

'सफाई मित्र' ॲप आहे तरी काय?

सफाई मित्र अप हे ॲंड्रॉइड फोनवर डाऊनलोड करता येईल. शहरात कोठेही अस्वच्छता आढळल्यास नागरिक त्या जागेचा फोटो काढून या अपवर अपलोड करू शकतात. ही तक्रार प्राप्त होताच संबंधित प्रभागाच्या स्वच्छता विभागाला त्याची माहिती मिळेल. विशेष म्हणजे, तक्रार मिळाल्यापासून २४ तासांच्या आत त्या जागेची स्वच्छता करणे बंधनकारक असणार आहे. जर त्या ठेकेदाराने तो कचरा उचलला नाही तर त्याला १० हजार रुपये इतका दंड आकारला जाणार आहे. याशिवाय जे नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवतील त्यांना ही १ हजार रुपये इतका दंड केला जाईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे. मोबाईल अपशिवाय वेब पोर्टलद्वारेही तक्रारी नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सद्यस्थितीत हे सफाई मित्र अप प्रयोगिक तत्त्वावर सुरू केले असल्याचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले आहे.

वसई-विरारमधील अनधिकृत घरांचा प्रश्न सुटणार!

'क्लस्टर योजना' राबवण्याचे विधानसभाध्यक्षांचे निर्देश

◆ विरार (प्रतिनिधी):

वसई-विरार महापालिका क्षेत्रात क्लस्टर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि त्याकरिता महापालिकेशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी दिले. वसई-विरार शहरात क्लस्टर योजना राबविण्यासाठी क्षेत्र निश्चित व्हावे, यासाठी भाजपचे आमदार राजन नाईक हे सातत्याने आग्रही असून त्यांच्या मागणीला यश आले.

आमदार राजन नाईक यांनी गेल्या पावसाळी अधिवेशनात ९ जुलै २०२५ रोजी वसई-विरारमध्ये क्लस्टर साकारण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून वसई-विरारमधील क्लस्टर योजनेस प्राधान्य देण्याची मागणी विधानसभा अध्यक्षांकडे केली होती तसेच मुंबईतील 'एसआरए' संदर्भात ६ मार्च रोजी विधानसभेत झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या अनुषंगाने विधानसभा अध्यक्षांनी एक विशेष बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार बुधवारी झालेल्या बैठकीस आमदार नाईक यांना निमंत्रित करण्यात आले होते. वसई-विरार महापालिका क्षेत्रातील एकूण १०,१६,००० मालमत्तांपैकी तब्बल ४,९९,००० मालमत्ता अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे ८७२ आरक्षित भूखंडांपैकी ३२९ भूखंडांवर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली आहेत. या परिस्थितीमुळे या भागातील पुनर्विकासाला गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत.

या व्यापक समस्येकडे आमदार राजन नाईक यांनी बैठकीत लक्ष वेधले. मुंबई वगळता राज्यातील इतर भागांसाठी एसआरएसंदर्भातील अधिसूचना ८ सप्टेंबर २०२० रोजी अस्तित्वात आली. मात्र गेल्या सहा वर्षांत वसई-विरारमध्ये एकाही झोपडपट्टी क्षेत्राची अधिकृत निश्चिती झालेली नाही. या शहरातील अशा वसाहती खासगी, सरकारी, रेल्वे, वन विभाग, गायरान आणि आदिवासी मालकीच्या भूखंडांवर वसलेल्या आहेत.

त्यावर उभारण्यात आलेली घरे व इमारती सामान्य नागरिकांना विकण्यात आल्या असल्या तरी, त्या मालमत्तांचे टायटल अद्यापही मूळ मालकांच्या नावेच आहे. त्यामुळे संबंधित रहिवासी व संस्थांना कायदेशीर मालकी हक्क प्राप्त झालेला नाही, अशी वस्तुस्थिती आमदार नाईक यांनी या बैठकीत मांडली. तसेच सदर क्षेत्र प्रस्तावित बुलेट ट्रेन स्थानकापासून पाच किलोमीटरच्या त्रिज्येत येते. भविष्यात हे क्षेत्र एक महत्त्वाचे 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे. अशा पार्श्वभूमीवर सध्याच्या एसआरए नियमावलीच्या चौकटीत पुनर्विकास साध्य करणे तज्ज्ञांच्या मते अव्यवहार्य असल्याचेही आमदार नाईक यांनी नमूद केले.या सर्व बाबींचा विचार करून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी महापालिकेशी समन्वय साधत वसई-विरार महापालिका क्षेत्रात क्लस्टर योजनेची त्वरित अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

शिक्षणाची जिद्द की पोटाची खळगी?

◆ मोखाडा (वार्ताहर) :

स्वातंत्र्याच्या अमृत काळात आजही मोखाड्याच्या दुर्गम भागात शिक्षणाची वाट काट्याकुट्यांतून आणि संघर्षातून जात आहे. तालुक्यातील रोजगाराच्या भीषण टंचाईमुळे घरचे कर्ते पुरुष आणि महिला शहरांकडे स्थलांतरित झाले आहेत. अशा परिस्थितीत मागे राहिलेली मुले केवळ घराची राखणच करत नाहीत, तर आपल्या शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी चक्क रस्त्याच्या कडेला रानमेवा विकताना दिसत आहेत. ज्या वयात हातांत खेळणी आणि मनात सुट्टीची मजा असायला हवी, त्या वयात मोखाड्यातील लहान मुली घाटात काजू, आंबे, तोरण आणि करवंद विकताना आढळतात.

"घरात पैसे नाहीत, आई-बाबा कामाला बाहेर गेलेत. मग शाळेची वही, पेन आणि रोजच्या खाऊसाठी पैसे कुठून आणणार? म्हणून आम्ही सुट्टीच्या दिवशी रानमेवा विकतो," असे हृदयद्रावक वास्तव या चिमुकल्यांनी बोलून दाखवले. एकीकडे शासन 'शिक्षण हक्क' आणि 'सक्तीचे शिक्षण' यासाठी कोट्यवधींच्या योजना आखत असल्याचा दावा करते. मात्र, प्रत्यक्षात शाळेत जाणाऱ्या या मुलांना साध्या वह्या-पेनसाठीही रानोमाळ भटकावे लागत आहे. पालकांच्या स्थलांतरामुळे ही मुले मागे राहिली असून, शिक्षणाची ओढ त्यांना रस्त्यावर बसून रानमेवा विकायला भाग पाडत आहे. मोखाड्याच्या या लेकींची जिद्द मोठी असली, तरी त्यांच्या नशिबी आलेला हा संघर्ष व्यवस्थेच्या अपयशावर बोट ठेवणारा आहे.

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

UJJIVAN

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३(२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आणि इसारा मध्ये/ डोके आणि इसारा मध्ये
१	४४१२२१० १८००००० १२/ ४४१२ – ठाणे	**१.राजेश महादेव वारणकर, २. राधा राजेश वारणकर, ३. प्रकाश महादेव वारणकर** सर्वांचा पत्ताः बी-३/१४, गायत्री धाम कॉ-ऑप हाऊसिंग सोसायटी, गणेश मंदिर रोड, टिटवाळा पूर्व, ठाणे, मांडा, महाराष्ट्र – ४२१६०५ अनु. क्र. १ येथे देखीलः एमपेटॅकस सोल्युशन्स, बी-३/१४, गायत्री धाम कॉ-ऑप हाऊसिंग सोसायटी, गणेश मंदिर रोड, टिटवाळा पूर्व, ठाणे, मांडा, महाराष्ट्र – ४२१६०५. अनु.क्र.३ येथे देखीलः चिन्मय, सावरकर नगर, नांदप रोड, शिवसेना शाखेजवळ, मांडा, टिटवाळा, ठाणे, महाराष्ट्र ४२१६०५	२१.०६.२०२५/ २०.०६.२०२५ अनुसार रु. १२,६२,६५९.२	१५.१०.२०२५	रु. १५,३०,०००/- रु. १,५३,०००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि नोंदणीकरण जिल्हा ठाणे उप नोंदणीकरण जिल्हा कल्याणचं हद्दीमधील गाव, मांडा, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ५१/२, ५२/पी ५३/२, ५४/६, २२१/१ पार्ट वर बांधण्यात आलेल्या गायत्री धाम सीएचएसएल, इमारत क्र. बी-३ च्या ३ ऱ्या मजल्यावरील साधारणपणे ५१० चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेल्या सदनिका क्र. १४ च्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः सर्वे क्र. २२१ (१) च्या सीमा आणि सर्वे क्र. ४९, पश्चिमः सर्वे क्र. ५४(२) च्या सीमा, उत्तरः सर्वे क्र. २२१, एस. क्र. ४२ आणि एस. क्र. २२० च्या सीमा, दक्षिणः मुख्य रोड (स्टेशन रोड). **राजेश महादेव वारणकर आणि राधा राजेश वारणकर ह्यांच्या मालकीची**

२	४४११२१०१३०० ००५६८/ ४४११- कोपरखैरणे	१.मिलिंद गंगाराम गमरे, २. शिल्पा नवनाथ जाधव दोघांचा पत्ताः प्रजापती आर्केड, सदनिका क्र. ०१, तळ मजला, घर क्र. ५३७, हनुमान मंदिराजवळ, देवाड पनवेल, रायगड, महाराष्ट्र. अनु. क्र.१ येथे देखीलः घर क्र. ५८९, भूषौहर बुद्धवाडी, शामपूर, संगमेश्वर, रत्नागिरी, महाराष्ट्र ४१५६०८ आणि सोडेक्स इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि. वॉकहार्ट हॉस्पिटल, १२ वा मजला, आग्रीपाडा, मोतीलाल स्ट्रीट, पोस्ट ऑफिस मागे, मुंबई सेन्ट्रल, मुंबई महाराष्ट्र ४०००११. अनु क्र. २ येथे देखीलः खोली क्र. ४ दिनेश गुप्ता चाळ, मोगरपाडा, सर्व्हिस रोड, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०००६९	०८.०४.२०२५/ ०४.०४.२०२५ अनुसार रु. १२,८९,८०४.८५	११.०८.२०२५	रु. १०,६९,०००/- रु. १,०६,९००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव देवाड, न्यू पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला नवीन घर क्र. १६, १५ बी, २१ ए वर बांधण्यात आलेल्या "दत्त सृष्टी" म्हणून ज्ञात इमारतीच्या ४ ठाया मजल्यावरील १६० चौ. फू. मोजमाप असलेल्या सदनिका क्र. ४०३ असलेल्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः इमारत, पश्चिमः चंद्रकांत वाघमारे, उत्तरः बिल्डींग, दक्षिणः बिल्डींग. मिलिंद गंगाराम गमरे आणि शिल्पा नवनाथ जाधव ह्यांच्या मालकीची

३	४४३५२१०१७ ०००००००/ ४४३५- बोरीवली	१)रितेश राकेश गुप्ता, २) दर्शना रितेश गुप्ता दोघांचा पत्ताः सदनिका क्र. ३०२/ए, ३ रा मजला, इमारत क्र. २, साई पूजा अपार्टमेंट, हनुमान मंदिराजवळ, देवरंग, बापगाव, भिवंडी, ठाणे कल्याण, महाराष्ट्र ४२१३०२. अनु. क्र. १ येथे देखीलः पार्थ सीएडी अँड सीएएम ज्वेलरी, बी-०/२, तळ मजला, १७७५/१७७६ जीवदया एसआरए सीएचएस, जय भवानी कंपाउंड, घाटकोपर पश्चिम, क्राईम ब्रांच ऑफिस मागे, मुंबई, महाराष्ट्र ४०००८६, आणि ए १२३९, शिव पूरम, कोयला नगर, किडवाई नगर, कानपूर नगर, उत्तर प्रदेश २०८०११	१३.०५.२०२५ / ०३.०५.२०२५ अनुसार रु. ११,४४,१३६.१	०९.१०.२०२५	रु. १८,०७,०००/- रु. १,८०,७००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि भिवंडी उप नोंदणीकरण जिल्हा, ग्रुप ग्रामपंचायत देवरंगच्या हद्दीमधील गाव देवरंग, गांधारी ब्रिज जवळ, तालुका भिवंडी जिल्हा ठाणे येथे वसलेल्या आणि असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ७५ हिस्सा क्र. ९ आणि १७ वर बांधण्यात आलेल्या "साई पूजा कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या विंग एच्या तिसऱ्या मजल्यावरील ५६० चौ. फू.चटई क्षेत्र असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ३०२ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः इमारत, पश्चिमः इमारत क्र. ०३, उत्तरः खुली जागा, दक्षिणः इमारत. **दर्शना रितेश गुप्ता आणि रितेश राकेश गुप्ता ह्यांच्या मालकीचे.**

४	४४११२१०१३ ०००००८१/ ४११ – कोपरखैरणे	१.सुनील नवनाथ गायकवाड, २. सुलन नवनाथ गायकवाड, दोघांचा पत्ताः एसएस-१, खोली क्र. ९९, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र ४००७०९. दोघे येथे देखीलः झेडपी शाळेनवळ, पाचीपट्टा गायकवाड वस्ती, मुक्काम पोस्ट मोहोळ, ता. मोहोळ, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र ४१३२१३	०४.०८.२०२२ / ११.०७.२०२२ अनुसार रु. ८,७२,१३०.१	१५.१२.२०२२	रु. ६,४६,०००/- रु. ६४,६००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पिंपरी, ता. आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या एन जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ७२/४/ए, ७२/४/सी, वर बांधण्यात आलेल्या "कर्म नगरी फेज – III सीएचएस लि. म्हणून ज्ञात असलेल्या दिवाच्या बी विंग च्या तळ मजला, २०५ चौ. फू. मोजमाप असलेली सदनिका क्र. २४. सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः त्रिशूल बिल्डींग, पश्चिमः सिलसिला बिल्डींग, उत्तरः कंपाउंड भिंत, दक्षिणः शक्ती बिल्डींग.

५	४४५६२१००५ ०००००००२/ ४४५६ – भिवंडी	१.अनुपकुमार फुलचंद केशरवाणी, २. राधा अनुपकुमार केशरवाणी. दोघांचा पत्ताः सदनिका क्र. ०६, ३ रा मजला, बालाजी प्लाझा, भारत कॉलनी, कामतघर रोड, चंदनबाग, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०५. अनु. क्र. १ येथे देखीलः न्यू संजय टाईल्स, घर क्र. १७०/२, केएपी समोर, कमला हॉटेल, आग्रा रोड, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२	०८.०४.२०२५/ ०४.०४.२०२५ अनुसार रु. २१,४३,६१.८८	१०.०७.२०२५	रु. १७,१०,०००/- रु. १,७१,०००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि उप जिल्हा भिवंडीमधील भिवंडी निझामपूर महानगरपालिका हद्दीमधील, गाव कामतघर, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे असलेल्या आणि वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र.५, हिस्सा क्र. ७ (पैकी) वर बांधण्यात आलेल्या "बालाजी प्लाझा कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" म्हणून ज्ञात सोसायटीमधील बालाजी प्लाझा" म्हणून ज्ञात आरसीसी इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ५७० चौ. फू मोजमापाच्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ८ सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः अंतर्गत रोड, पश्चिमः इमारत, उत्तरः इमारत, दक्षिणः इमारत. **अनुपकुमार फुलचंद केशरवाणी आणि राधा अनुपकुमार केशरवाणी ह्यांच्या मालकीचे.**

६	४४१२२२०२ ८००००००२ आणि ४४१२२३०० ५०००००००२/ ४४१२- ठाणे	**१.एम जे एक्सपोर्टस – त्यांचे एकमेव प्रोप्रायटर शेख जिलानी मेहबूब साहेब, २. शेख जिलानी मेहबूब साहेब, ३. रिझवाना जिलानी शेख,** अनु. क्र. १ आणि २ चा पत्ताः एच. क्र. ३७८, १५३/८, इमारत क्र. १५३, गाळा क्र. ८, तळ मजला, इंडियन कॉम्प्लेक्स, भिवंडी, ठाणे महाराष्ट्र ४२१३०२. अनु क्र २ आणि ३ चा पत्ताः सदनिका क्र. १५०१, १५ वा मजला, ए विंग, रेफान टॉवर, एस. व्ही. रोड, दिवाण सेंटर आणि मीना इंटरनेशनलसमोर, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई महाराष्ट्र ४००१०२	०५.०२.२०२५/ २३.०१.२०२५ अनुसार रु. ५४,२२,१४२.४	०७.०८.२०२५	रु. ८४,४०,०००/- रु. ८,४४,०००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव गुंदवली, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २/५/१, ५/२, ५/३, ५/४, ६, ७, ४/१, २, ३, ४ पी, ५ ते ९ ५/१ ते ७, ६, १०, ११/१/१, १/२, २, ३/ए वर बांधण्यात आलेल्या "इंडियन कॉम्प्लेक्स" म्हणून उंच बांधण्याच्या हक्कासह नमूद गोडाऊनच्या बेनेथ जमिनीच्या समांतर इमारत क्र. १५३ मधील अंदाजे ३४८.५१ चौ. मी.मोजमाप असलेला मालमत्तेचा धारण केलेला एसी शीट औद्योगिक गाळा २२ फूट पर्यंत धारण केलेला क्र.८ मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः ५०.० रुंद रोड, पश्चिमः इमारत क्र. १४६ मधील गोडाऊन क्र. ८, उत्तरः गोडाऊन क्र. ७, दक्षिणः गोडाऊन क्र. ९. **जिलानी शेख मेहमूद साहेब शेख ह्यांच्या मालकीचे.**

७	४४१९२१०१ ७००००००५/ ४४१९ – अंबरनाथ	१.युसुफ इब्राहीम मोहम्मद, २. सलमा युसुफ शेख दोघांचा पत्ताः खोली क्र. १०११, १ ला मजला, करम नगरी सोसायटी, एकलव्य इमारत क्र. १, ई-बिल्डींग फेज-IV, सर्वे क्र. ७०/१, ७१, पिंपरी एकता कट्टा, गाव पिंपरी, ठाणे, एमएच ४००६१२. अनु. क्र. १ येथे देखील :खोली क्र. ०३, मंगल मूर्ती सीएचएस, प्लॉट क्र. एफ ३०, सेक्टर १२, खारघर, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२१०.	१८.०६.२०२५/ ३१.०५.२०२५ अनुसार रु. १२,३४,४९६.१	१९.११.२०२५	रु. ९,८३,०००/- रु. ९८,३००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पिंपरी, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ७०/१ आणि ७१ वर बांधण्यात आलेल्या एकता नगरी म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पामधील एकलव्य म्हणून ज्ञात इमारतीच्या ई बिल्डींग, फेज IV च्या १ ल्या मजल्यावरील मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १०११ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणे : पूर्वः डेरा ४/डी सीएचएस, पश्चिमः आयडियल इंग्लिश स्कूल, दक्षिण : रोड, उत्तरः खुली जागा. **सलमा युसुफ शेख आणि युसुफ मोहम्मद ह्यांच्या मालकीचे .**

८	४४१६२१०१३ ०००५६१/ ४४१६ – कल्याण	१.विकी बचन शिर्के, २. प्रकाश बचन शिर्के दोघांचा पत्ताः खोली क्र. ३०१, बी विंग, सेजल अपार्टमेंट, दिवा दातिवली रोड, दिवा ठाणे ४००६१२. येथे देखीलः पोस्ट सांबुर, उधवाने गाव, तालुका पटर, सातारा, महाराष्ट्र ४१५११२. अनु. क्र. १ येथे देखीलः कल्पतरू मॅनपॉवर सप्लाय, श्री कृपा अपार्टमेंट, डी. जे. कॉम्प्लेक्स, साबे गाव, दिवा, ठाणे महाराष्ट्र ४००६१२. अनु. क्र. २ येथे देखीलः २२२/३, गणेश विकास मित्र मंडळ, तुर्भीज रोड, फॉरेस्ट नाका, वसई, ठाणे, महाराष्ट्र ४०१२०९	०५.०३.२०२५/ ०१.०३.२०२५ अनुसार रु. १४,७५,३४३.०	११.०६.२०२५	रु. ११,३१,०००/- रु. १,१३,१००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव दातिवली तालुका आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १३४ हिस्सा क्र. २ वर बांधण्यात आलेल्या "संदीप रेसिडन्सी" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या बी विंगच्या ३ ऱ्या मजल्यावरील ४०० चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ३०८ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणेः पूर्वः बी विंग, पश्चिमः रोड, दक्षिणः रोड, उत्तरः इमारत, **विकी बचन शिर्के ह्यांच्या मालकीचे**

९	४४१६२१०१३ ०००००४४ /४४१६-कल्याण	**१.सुधाकर गणपत चाफे, २. शुभांगी चाफे** दोघांचा पत्ताः सदनिका क्र. १०४, विजय अपार्टमेंट, महालक्ष्मी सुपरमार्केट जवळ, एचपी पेट्रोल पंपाच्या मागे, वांगणी पूर्व, ठाणे, महाराष्ट्र -४२१५०३, येथे देखील १: सी/ओ इंडियन नेव्ही, एसएच-०९, तेकंत क्र.५६१६९ बी, नवल स्टोर डेपो, हे बंदर रोड, महेंद्रा अँड महेंद्र कं., शिवडी, मुंबई-३३, महाराष्ट्र-४०००३३	१८.०१.२०२४/ १५.०१.२०२४ अनुसार रु. ९,५०,११३.९	२५.०४.२०२४	रु. ५,५५,०००/- रु. ५५,५००/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव शेलू, तालुका कर्जत आणि नोंदणीकरण जिल्हा रायगडच्या शेलू ग्रामपंचायत, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथे असलेल्या २७५ चौ. मी. मोजमाप असलेल्या बिगर शेत जमिनीचा धारण केलेला गट क्र. १४०/६ च्या सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या "यशराज अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ४३५ चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. १०३ श्री सुधाकर गणपत चाफे आणि श्रीमती शुभांगी सुधाकर चाफे ह्यांच्या मालकीचे.

१०	४४१९२१०१३ ०००००४०५/ ४४१९ अंबरनाथ	**१. निलिमा लक्ष्मीदास ठक्कर, २. जय चेलारा